# गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा - सूक्ष्मजीवशास्त्र विभाग

मू.जे .महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे प्रथम विद्यार्थी सत्कार सोहळा पार पडला .या वेळी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रथम आलेल्या गुणवंत विध्यार्थ्यांना गौरविण्यात आले .

या वेळी अध्यक्षस्थानी उप प्राचार्या डॉ.देवयानी बेंडाळे यांच्यासह ग्रंथपाल डॉ.व्ही.एस.कंची उपस्थित होते .प्रस्तावना विभागप्रमुख डॉ.के.पी.नारखेडे यांनी केली .कार्यक्रमात पदवीतील प्रथम वर्षातील प्रणिता जावळे ,द्वितीय वर्षातील दिव्या महाजन ,तृतीय ट्विंकल मराठे ,यांच्यासह पदव्युत्तर मधील प्रथम वर्षातील राधिका पाटील ,द्वितीय वर्षातील पल्लवी पवार या प्रथम आलेल्यांना मान्यवरांनी गौरविले .तसेच पदवीधर प्रथम वर्षी दाखल झालेले प्रथम पारितोषिक सिद्धेश वाणी आणि प्रथम वर्षी दाखल झालेले वैभव कुलकर्णी यांचाही सत्कार झाला .



विद्यार्थ्यांच्या पालकांचाही सत्कार करण्यात आला .क्रमिक शिक्षणाबरोबर व्यावहारिक शिक्षणावरही भर द्यावा असे डॉ.कंची यावेळी म्हणाले .कार्यक्रमाचे संयोजन प्रा.प्राजक्ता देसले यांनी तर सूत्रसंचालन रुचिता सपकाळे यांनी केले .